| | | |
|---|---|---|
| | दाखल तारीख | २६.०६.२०२३ |
| | नोंदणी तारीख | २६.०६.२०२३ |
| | निर्णय तारीख | १४.०५.२०२४ |
| | कालावधी | ०० व १० म १८ दि. |
| **MHSN170018732020** | **निशाणी क्र.** | **२४** |

**भाग अ**

| |
|---|
| **विटा येथील सत्र न्यायालयात** |
| पिठासीन अधिकारी : श्री. दिगंबर य. गौड, अतिरिक्त सत्र न्यायाधीश विटा |
| न्यायनिर्णय तारीख - १४/०५/२०२४ |
| **सत्र खटला क्रमांक ४१७/२०२४**<br>**(जुना सत्र खटला क्र.१५७/२०२३)** |
| **आटपाडी पोलीस ठाणे गु. र. नं.१९३/२०२०** |

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :- | महाराष्ट्र सरकार<br>पोलीस निरीक्षक आटपाडी पोलीस ठाणे. |
| सरकार पक्षातर्फे विधीज्ञ | :- | श्री एस.आर.हिंगमिरे<br>सरकारी अभियोक्ता |
| **आरोपी** | १. | संजय जनार्दन देशमुख,<br>वय ४० वर्षे, धंदा नोकरी,<br>रा.हिवतड, ता.आटपाडी, जि.सांगली |
| आरोपींतर्फे विधीज्ञ | | विधीज्ञ श्री ए.एम.पटेल |

**भाग ब**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | : | ११.०६.२०२० |
| फिर्याद दाखल तारीख | : | ११.०६.२०२० |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | : | १८.०२.२०२२ |
| पुरावा सुरु झालेची तारीख | : | ३०.०३.२०२४ |
| न्यायनिर्णयासाठी राखीव तारीख | : | १३.०५.२०२४ |
| न्यायनिर्णय तारीख | : | १४.०५.२०२४ |
| शिक्षा दिलेची तारीख (असल्यास) | : | शिक्षा नाही. |

## आरोपींची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामीनावर सोडलेची तारीख | ठेवण्यात आलेले गुन्हे | दोषमुक्त / शिक्षा | दिलेली शिक्षा | न्यायबंदी कालावधी फौ.प्र.सं.कलम ४२८ करीता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | संजय जनार्दन देशमुख | अटकपुर्व जामीनावर खुला | ..... | भा.द.वि.कलम ३०७, ३२६, ३२४, १४३, १४७,१४८,१४९, ५०६ सह महाराष्ट्र पोलस अधिनियम १९५१ चे कलम १३५ अन्वये | शिक्षा नाही | -- | -- |

**भाग क**

**(क्रिमीनल मॅन्यूअल चॅप्टर ६ परिच्छेद ४४ (iii) प्रमाणे सरकार पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयाचे वतीने घेण्यात आलेली साक्षीदारांची यादी)**

**अ - सरकार पक्ष**

| क्रमांक | निशाणी क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | १० | भगवान शामराव देशमुख | फिर्यादी |
| अ.सा.क्र.२ | १३ | सुनिल भगवान देशमुख | फिर्यादीचा भाऊ |
| अ.सा.क्र.३ | १५ | संगिता भगवान देशमुख | फिर्यादीची पत्नी |
| अ.सा.क्र.४ | १७ | धनश्री सुनिल देशमुख | सा.क्र.२ ची बायको |
| अ.सा.क्र.५ | १९ | अजित आनंदा पाटील | पोलीस स्टेशन ऑफीसर |

**बचाव पक्षाचे वतीने तपासलेले साक्षीदार**

| क्रमांक | निशाणी क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

**अभियोग पक्षातर्फे दाखल व निशाणी झालेली कागदपत्रे**

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १. | ११ | फिर्यादीची जबाबावरील सही |
| २. | १२ | फौ.प्र.सं.१६४ प्रमाणे फिर्यादीचा जबाब |

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| ३. | १४ | फौ.प्र.सं.१६४ प्रमाणे सा.क्र.२ चा जबाब |
| ४. | १६ | फौ.प्र.सं.१६४ प्रमाणे सा.क्र.३ चा जबाब |
| ५. | १८ | फौ.प्र.सं.१६४ प्रमाणे सा.क्र.४ जबाब |
| ६. | २० | फिर्याद |

**<u>बचाव पक्षातर्फे शाबीत केलेले कागद</u>**

| **अ.क्र.** | **निशाणी क्र.** | **कागदपत्राचा तपशील** |
|---|---|---|
| --- | --- | --- |

**<u>मुद्देमाल साहित्य</u>**

| **अ.क्र.** | **वस्तू क्र.** | **तपशील** |
|---|---|---|
| १ | पी.१ | फोटो |
| २ | पी.२ | फोटो |
| ३ | पी.३ | फोटो |

**दोषारोपः भा.द.वि.कलम ३०७, ३२६, ३२४, १४३, १४७,१४८,१४९, ५०६ सह महाराष्ट्र पोलस अधिनियम १९५१ चे कलम १३५ अन्वये**

## <u>न्यायनिर्णय</u>

(<u>अधिघोषीत दि. १४.०५.२०२४</u>)

प्रस्तूत प्रकरणात आरोपीची भारतीय दंड संहिता कलम ३०७, ३२६, ३२४, १४३, १४७,१४८,१४९, ५०६ सह महाराष्ट्र पोलस अधिनियम १९५१ चे कलम १३५ अन्वये नुसार संपरीक्षा घेण्यात आली.

२. अभियोग पक्षाचे थोडक्यात वाद कथन असे आहे की, यातील मुळ फिर्यादी भगवान शामराव देशमुख यांनी पोलीस स्टेशनला अशी फिर्याद दिली की, दि.१०.०६.२०२० रोजी रात्री ९.३० वाजता तो, त्याची पत्नी, मुलगा व सुन असे त्यांचे हिवतड, ता.आटपाडी,जि.सांगली येथील त्यांचे घरासमोरील ओटयावर जेवण करीत असताना आरोपी संजय जनार्दन देशमुख हा त्यांचे मध्ये असलेल्या जमीनीच्या वादावरून त्याचे सोबत ७ ते ८ अनोळखी लोकांसह त्या सर्वांना ठार मारण्याच्या

उद्देशाने हातामध्ये काठया घेवुन त्यांच्यावर हल्ला केला. त्या हल्यामध्ये त्याला, त्याचा मोठा मुलगा सुनिल यांच्या डोक्यामध्ये वर्मी जबर मार लागला. तसेच त्याची पत्नी संगिता व लहान मुलगा अनिल हे देखील जखमी केले व जाताना कळला का संजय देशमुख चा नमुना अशी धमकी देऊन मोटरसायकलवरून पळून गेला. म्हणून फिर्यादी यांनी आटपाडी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार गुन्हा नोंद करण्यात आला.

३. सदर गुन्हयाचा तपास पोलीस अधिकारी यांनी केला व तपासांती सबळ पुरावा मिळून आल्याने आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

४. दोषारोपपत्र व पोलीस कागदपत्रांवरून आरोपींविरुध्द दोषारोप नोंदविले. आरोपीने गुन्हयाची नाकबुली दिल्याने अभियोग पक्षाचा पुरावा नोंदविण्यात आला. अभियोगपक्षातर्फे पाच साक्षीदार तपासले. सादर पुराव्यावरून आरोपीविरुध्द पुरावा आढळून आल्याने त्याचे फौजदारी व्यवहार संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन नोंदविले.

५. फिर्यादी पक्षाच्या कथनावरुन व दाखल पुराव्यावरून खालील मुद्दे उपस्थित झाले असून त्यांचे निष्कर्ष त्यांच्यासमोर खालील दिलेल्या कारणामीमांसाप्रमाणे नोंदविलेले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की,आरोपी संजय जनार्दन देशमुख व इतर अनोळखी ७-८ इसमांनी दि.१०.०६.२०२० रोजी रात्री ९.३० वाजता फिर्यादीच्या हिवतड, ता.आटपाडी,जि.सांगली येथील घरासमोर संगनमताने बेकायदा जमाव जमवून फिर्यादी व साक्षीदारांना काठीने त्यांचा खुन होईल अशा पध्दतीने मारहाण केली ? | नाही |
| २) | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की,आरोपी संजय जनार्दन देशमुख व इतर अनोळखी ७-८ इसमांनी यांनी संगनमताने बेकायदा जमाव जमवून फिर्यादी व साक्षीदारांना प्राणघातक हत्यारांनी म्हणजेच काठीने मारहाण करून गंभीर जखमी केले ? | नाही |
| ३) | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की,आरोपी संजय जनार्दन देशमुख व इतर अनोळखी ७-८ इसमांनी यांनी संगनमताने बेकायदा जमाव जमवून फिर्यादी व साक्षीदारांना | नाही |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | काठीने मारहाण करून गंभीर जखमी केले ? | |
| ४) | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की,आरोपी संजय जनार्दन देशमुख व इतर अनोळखी ७-८ इसमांनी संगनमताने बेकायदा जमाव जमवून त्यांचा फिर्यादीस मारहाण करण्याचा उद्देश होता ? | नाही |
| ५) | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की,आरोपी संजय जनार्दन देशमुख व इतर अनोळखी ७-८ इसमांनी संगनमताने बेकायदा जमाव जमवून दंगल करण्याचा गुन्हा केला ? | नाही |
| ६) | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की,आरोपी संजय जनार्दन देशमुख व इतर अनोळखी ७-८ इसमांनी संगनमताने बेकायदा जमाव जमवून काठयांनी मारहाण केली ज्याच्यामुळे फिर्यादी अथवा साक्षीदारांचा मृत्यू झाला असता ? | नाही |
| ७) | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की,आरोपी क्र.१ ते ५ यांनी संगनमताने बेकायदा जमाव जमवून फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी दिली ? | नाही |
| ८) | अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की,आरोपी क्र.१ ते ५ यांनी संगनमताने बेकायदा जमाव जमवून मा.जिल्हाधिकारी सांगली यांच्या जमाव बंदी आदेशाचे उलंघ्घन केले ? | नाही |
| ९) | कोणता आदेश? | : अंतिम आदेशा-प्रमाणे |

## कारणमिमांसा

**युक्तीवादः**

अभियोग पक्षातर्फे अति. सरकारी अभियोक्ता श्री एस.आर.हिंगमिरे व आरोपीतर्फे वकील श्री. ए.एम.पटेल यांनी रेकॉर्डवर दाखल पुराव्यानुसार त्यांचा युक्तीवाद ग्राहय धरण्यात यावा असे सांगितले.

**मुद्दा क्रमांकः १ ते ९ बाबतः**

७. यातील अभियोग पक्षातर्फे आरोपींविरुध्द असा दोषारोप ठेवण्यात आला आहे की, आरोपीने जमीनीच्या वादावरून त्याचे सोबत ७ ते ८ अनोळखी लोकांसह फिर्यादी व साक्षीदारांना ठार मारण्याच्या उद्देशाने हातामध्ये काठया घेवुन त्यांच्यावर हल्ला केला. त्या हल्यामध्ये त्याला, त्याचा मोठा मुलगा सुनिल यांच्या

डोक्यामध्ये वर्मी जबर मार लागला. तसेच त्याची पत्नी संगिता व लहान मुलगा अनिल हे देखील जखमी केले व जाताना कळला का संजय देशमुख चा नमुना अशी धमकी देऊन मोटरसायकलवरून पळून गेला.

८. साक्षीदार क्र.१ भगवान शामराव देशमुख यांची साक्ष नि.१० कडे नोंदविली आहे. हे फिर्यादी आहेत. मात्र त्यांनी आपल्या साक्षीमध्ये आरोपीने त्याला व अन्य साक्षीदारांना काठयानी मारहाण केली व धमकी दिली असे कुठेही कथन केलेले नाही. इतकेच नव्हे तर त्यांनी हे देखील नाकारले आहे की मारहाण करणा-यापैकी एकाने तोंडाचे कपडे काढले व तो म्हणाला की संजय देशमुखचा नमुना तुम्हाला कळाला का. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य न केल्याने सरकारी वकीलांनी उलटतपासात विचारता येण्यासारखे प्रश्न साक्षीदारास विचारले परंतू त्याद्वारे आरोपी विरुध्द दोषारोप ठेवण्याबाबत कोणताही पुरावा रेकॉर्डवर आला नाही.

९. या कामी आटपाडी न्यायालयात फिर्यादीचा फौ.प्र.सं.कलम १६४ अन्वये नि.१२ प्रमाणे जबाब झाला होता. परंतू फिर्यादीच्या उलटतपासामध्ये त्यांनी हे मान्य केले आहे की, घटनेदिवशी त्याने आरोपी संजय देशमुख याला घटनास्थळी पाहिले नाही. व त्यांनी आटपाडी न्यायालयात पोलीसांच्या सांगण्यानुसार १६४ चा जबाब दिला होता.

१० साक्षीदार क्र.२ सुनिल भगवान देशमुख हा मयताचा मुलगा असून त्याची साक्ष नि.१३ कडे, साक्षीदार क्र.३ संगिता भगवान देशमुख यांची साक्ष नि.१५ कडे व साक्षीदार क्र.४ धनश्री सुनिल देशमुख यांची साक्ष नि.१७ कडे नोंदविली आहे. या सर्व साक्षीदारांनी आपले साक्षीत आरोपीने त्यांना व अन्य साक्षीदारांना काठयानी मारहाण केली व धमकी दिली असे कुठेही कथन केलेले नाही. इतकेच नव्हे तर त्यांनी हे देखील नाकारले आहे की मारहाण करणा-यापैकी एकाने तोंडाचे कपडे काढले व तो म्हणाला की संजय देशमुखचा नमुना तुम्हाला कळाला का. सदर साक्षीदारांनी अभियोग पक्षास सहकार्य न केल्याने सरकारी वकीलांनी उलटतपासात विचारता येण्यासारखे प्रश्न साक्षीदारांना विचारले परंतू त्याद्वारे आरोपी विरुध्द दोषारोप ठेवण्याबाबत कोणताही पुरावा रेकॉर्डवर आला नाही.

९. या कामी साक्षीदार क्र.२ ते ४ यांचा देखील आटपाडी न्यायालयात फिर्यादीचा फौ.प्र.सं.कलम १६४ अन्वये जबाब झाला होता. परंतू त्यांनी आपले उलटतपासामध्ये हे मान्य केले आहे की, घटनेदिवशी त्याने आरोपी संजय देशमुख याला घटनास्थळी पाहिले नाही. व त्यांनी आटपाडी न्यायालयात पोलीसांच्या सांगण्यानुसार १६४ चा जबाब दिला होता. साक्षीदार क्र.५ अजित आनंदा पाटील हे

पोलीस स्टेशन ऑफीसर असून त्यांनी फिर्यादीचा जबाब नोंदविला आहे. परंतू या कामी फिर्यादी व इतर साक्षीदारांनी आरोपींनी त्यांना काठयानी मारहाण केल्याचे कथन केलेले नाही. त्यामुळे जरी या साक्षीदाराने फिर्याद नि.२० सिध्द केली असली तरी देखील त्याद्वारे आरोपी विरुध्द कोणताही गुन्हा सिध्द होत नाही.

९. अशाप्रकारे प्रस्तुत कामी अभियोग पक्ष असे सिध्द करु शकला नाही की आरोपीने जमीनीच्या वादावरून त्याचे सोबत ७ ते ८ अनोळखी लोकांसह फिर्यादी व साक्षीदारांना ठार मारण्याच्या उद्देशाने हातामध्ये काठया घेवुन त्यांच्यावर हल्ला केला. त्या हल्यामध्ये त्याला, त्याचा मोठा मुलगा सुनिल यांच्या डोक्यामध्ये वर्मी जबर मार लागला. तसेच त्याची पत्नी संगिता व लहान मुलगा अनिल हे देखील जखमी केले व जाताना कळला का संजय देशमुख चा नमुना अशी धमकी देऊन मोटरसायकलवरून पळून गेला. यामुळे मुद्दा क्र. १ ते ८ चा निष्कर्ष नकारार्थी देतो व मुद्दा क्र. ९ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| १) | आरोपी संजय जनार्दन देशमुख यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३५(१) अन्वये भारतीय दंड संहिता कलम ३०७, ३२६, ३२४, १४३, १४७,१४८,१४९, ५०६ सह महाराष्ट्र पोलस अधिनियम १९५१ चे कलम १३५ या दोषारोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २) | आरोपीचा जामीन कदबा रद्द करण्यात येतात. |
| ३) | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७(अ) अन्वये अपिल कालावधीसाठी व अपील दाखल झालेस त्याकामी विनाविलंब हजर राहणेच्या हमीसाठी रक्कम रु.५०००/-चा वैयक्तीक जातमुचलका व तितक्याच रकमेचा जामीनदार सादर करावा. |
| ४) | जप्त मुद्देमाल अपील कालावधी नंतर नाश करणेत यावा. |

(खुल्या न्यायालयात अधिघोषीत केला)

DIGAMBER YASHWANT GAUD

Digitally signed by DIGAMBER YASHWANT GAUD
Date: 2024.05.15 11:21:57 +0530

विटा
दिनांकः १४.०५.२०२४.

(दिगंबर यशवंत गौड)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, विटा

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी प्रमाणित करतो की, या पीडीएफ फाईलमधील मजकूर व मुळ आदेश / न्यायनिर्णय मधील मजकूर हा एकसारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | **:** | संजय वि.अग्निहोत्री |
| पिठासीन अधिकारी व कोर्टचे नांव | **:** | दिगंबर यशवंत गौड<br>अतिरिक्त सत्र न्यायाधीश, विटा |
| आदेश पारीत तारीख | : | १४/०५/२०२४ |
| आदेश/ न्यायनिर्णय टंकलेखन तारीख | : | १४/०५/२०२४ |
| आदेश/ न्यायनिर्णय अपलोड तारीख | : | १४/०५/२०२४ |